● मंगळवार, दि १७ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ५७ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# ... तोपर्यंत भारत-बांगलादेश क्रिकेट सामने रद्द करा!

## हिंदु जनजागृती समितीची मागणी !

**मुंबई । प्रतिनिधी -** बांगलादेशातील हिंदूंवर अद्यापही अत्याचार चालू असतांना बांगलादेश आणि भारत यांच्यात क्रिकेटचे सामने आयोजित करणे हा हिंदूंच्या जखमेवर मीठ चोळण्याचा संतापजनक प्रकार आहे. जोपर्यंत बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचार थांबत नाहीत, तोपर्यंत भारत-बांगलादेश यांच्यातील सर्व क्रिकेट सामने आणि बांगलादेशी कलाकारांचे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात यावेत, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने 'भारतीय क्रिकेट नियामक मंडळा'कडे (इउउख) केली आहे. याविषयीचे निवेदन हिंदू जनजागृती समितीच्या वतीने 'भारतीय क्रिकेट नियामक मंडळ' (इउउख) येथील विशेष कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले, या वेळी हिंदू जनजागृती समितीचे अधिवक्ता अनीश परळकर, मानव सेवा प्रतिष्ठानचे श्री. विनायक शिंदे, धर्मप्रेमी अधिवक्ता राहुल पाटकर, श्री. रविंद्र दासारी, श्री. संदीप तुळसकर हे उपस्थित होते. या निवेदनाची प्रत देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी, केंद्रीय क्रीडामंत्री आणि परराष्ट्रमंत्री यांनाही देण्यात आली आहे.

या वेळी सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बांगलादेशसोबत भारताचे क्रिकेटचे दोन कसोटी सामने आणि तीन टी-२० सामने १९ सप्टेंबर ते १२ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत भारतात आयोजित करण्यात आले आहेत. हे क्रिकेट सामने चेन्नई, कानपूर, ग्वालियर, दिल्ली आणि हैदराबाद येथे होणार आहे. दुसरीकडे बांगलादेशातील हिंदू समाजावर सातत्याने हल्ले चालू आहेत. आतापर्यंत २३० लोकांचा मृत्यू झाला असून, बांगलादेशातील ६४ जिल्ह्यांपैकी ५२ जिल्ह्यांमध्ये हिंदूविरोधी हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत. शेख हसीना सरकारच्या राजीनाम्यानंतर हिंदूंच्या विरोधातील हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. विशेषतः ग्रामीण भागात हिंसाचार अधिक आहे, जिथे हिंदू समुदाय असुरक्षिततेच्या वातावरणात जीवन जगत आहे. नुकतीच उत्सव मंडल या तरुण हिंदु युवकाचे कथित ईशनिंदेच्या आरोपाखाली जिहादी जमावाने थेट पोलीस ठाण्यात घुसून त्या युवकाचे दोन्ही डोळे काढून चिरडले. अशा प्रकारे बांगलादेशात हिंदूवरील आक्रमणे करणे, त्यांच्या निर्घृण हत्या करणे हे राजरोसपणे चालू आहे.

मुसलमान समाजावर होणार्या कोणत्याही आघाताला इतर मुसलमान देश तीव्र विरोध करतात, तशीच भूमिका भारताने हिंदूवरील हल्ल्यांच्या विरोधात घ्यावी. बांगलादेशात तेथील धर्मांध जिहादी हिंदूंच्या राजरोसपणे हत्या करणार, हिंदूंची घरे जाळणार, हिंदूंच्या मंदिरांची तोडफोड करणार, भूमी बळकावणार, हिंदू महिलांवर बलात्कार करणार आणि आम्ही त्यांच्यासोबत क्रिकेटचे सामने खेळायचे का ? हे आम्ही कदापी सहन करणार नाही, असे समितीने म्हटले आहे.




# श्रीकृष्ण आपल्याला जीवन कसे जगावे हे शिकवतात - आ. लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** हिंदु धर्मातील अत्यंत आदरणीय आणि गौरवास्पद विभूती असलेले साधू-संत म्हणजे आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवाच आहेत.देव देश आणि धर्म यांची सद्यस्थिती बिकट असल्याने ती सुधारण्यासाठी कार्य करणाऱ्या असलेल्या काही साधू-संतांनी जगदोद्धारासाठी जीवन वेचले आहे. भगवान श्रीकृष्णाने आपल्याला जीवन कसे जगावे याचा संदेश देत असताना देव देश आणि धर्म टिकवण्यासाठी श्रीमद्भगवद्गीतेच्या माध्यमातून उपदेश केला असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी येथे केले



मंठा तालुक्यातील केंधळी येथे श्रीकृष्ण महानुभाव संस्था केंधळीच्या माध्यमातून भगवान श्री गोविंद प्रभू अवतार दिन व पंचावतार उपहार म होत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमादरम्यान श्रीकृष्ण मूर्ती मंगल स्नान गीता पारायण ध्वजारोहण संत वाहनतांचे स्वागत धर्म सभा प्रमुख व्याख्यान उपहार आरती व महाप्रसाद असे संयोजन करण्यात आले होते याप्रसंगी माजी मंत्री आमदार श्री लोणीकर बोलत होते

राजकीय क्षेत्रात काम करत असताना आपण कायम धर्मकार्य हाती घेतलेल्या असून या धर्मकार्याच्या बळावरच गेली २५-३० वर्ष राजकारणात मी टिकून आहे देशातील प्रत्येक घटकाच्या राजकारणाला धम र्चि अधिष्ठान असून या मतदारसंघाचा आमदार म्हणून देव देश आणि धर्म यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची माझी जबाबदारी आहे आणि ती जबाबदारी मी निष्ठापूर्वक पार पाडण्याचा सातत्याने प्रयत्न करणार आहे असेही लोणीकर यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले

भगवान श्री गोविंद प्रभू अवतार दिन व पंचावतार उपहार महोत्सव प्रसंगी आचार्य महंत श्री दुधगावकर बाबा शास्त्री यांनी केंधळी येथील श्रीकृष्ण महानुभाव संस्थेसाठी सभामंडप उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी केली असता केवळ केंधळी येथील श्रीकृष्ण मंदिरासाठीच नव्हे तर मतदारसंघात ज्या-ज्या ठिकाणी श्रीकृष्णाचे मंदिर उभे राहील त्या त्या ठिकाणी आमदार म्हणून मी सभामंडप पान २ वर

# गाडगेबाबा घाणेवाडी जलाशयाच्या समृद्धीसाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार - खा. डॉ. काळे



**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रसंत गाडगेबाबा घाणेवाडी जलाशयाच्या समृद्धीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन खासदार डॉ. कल्याण काळे यांनी दिले. घाणेवाडी येथील संत गाडगेबाबा जलाशयाला सोमवार दि.१६ रोजी त्यांनी भेट दिली. तलावाची पहाणी करून या तलावाच्या विकासासह विविध समस्या सम जून घेतल्या. यावेळी शिरपूर पॅटर्नचे जनक जलतज्ज्ञ सुरेश खानापूरकर, घाणेवाडी जलसंरक्षण मंचाचे अध्यक्ष भाईश्री रम ेशभाई पटेल, जयप्रकाश चव्हाण, पान २ वर

## युवा आदर्श

### उद्घाटन ना ...

ऊरा ऊरात जागली
रे मराठवाडी मशाल
छाती झाली निधडी
मारा गोळ्या खुशाल
अत्याचारी रझाकारी
करी अनन्वीत हाल
उभा राहीला सामान्य
बनला किती जहाल
ठिणगी हो प्रज्वलीत
स्वातंत्र्यलढा विशाल
शहीदा शरीरा वरती
रक्ताची पांघरी शाल
सामान्य झाले शहीद
सेनानी पदवी बहाल
कुणा कुणाला आवरू
रझाकार होई बेहाल
ठेचली विंचवी नांगी
असून विष ते जहाल
दिडशे वर्षांचा जुना
कोसळू पाही महाल
आली नव उषःकाल
केली कसली कमाल
विरून अंधारी रात्र
स्वातंत्र्याची सकाळ
उघडू स्मृतींची कुपी
आठवण सालोसाल
भविष्यातले युध्दात
इतिहास बनतो ढाल

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# चर्मकार समाजाच्या विविध मागण्यासाठी उद्यापासून देविलाल बिरसोने यांचे उपोषण



**जालना । प्रतिनिधी -** सकल चर्मकार समाज व अखिल भारतीय गुरू रविदास परिवर्तन सेनेच्या वतीने दिनांक १८ सप्टेंबर वार बुधवारी दुपारी ११:00 वाजेपासून चर्मकार समाजाच्या विविध मागण्यासाठी देवीलाल बिरसोने हे आम्हाला उपोषणास बसणार असून या संदर्भात मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना जिल्हाधिकारी जालना यांच्या मार्फत लेखी निवेदन देण्यात आले आहे.

यामध्ये चर्मकार सम ाजाच्या विविध मागण्यांसाठी दिनांक १८ सप्टेंबर २०२४ वार बुधवार वेळ सकाळी ११ वाजेपासून आमरण उपोषण वरील विषय निवेदन देण्यात येते की महाराष्ट्रातील चर्मकार सम ाजाच्या प्रश्नासाठी वारंवार निवेदन मोर्चा आंदोलन करण्यात येत आहे .चर्मकार समाजाचे कोणतेच प्रश्न मार्गी लागत नाही म्हणून चर्मकार समाजाच्या म ागण्यांसाठी दिनांक १८ सप्टेंबर पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसण्यात येत असल्याचे पत्र जिल्हाधिकारी जालना पान २ वर

# जालन्यात शुक्रवारपासून राज्यस्तरीय कृषी महोत्सव- आ.कैलास गोरंट्याल

## तीन दिवसीय महोत्सवात परिसंवाद, चर्चासत्रासह सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

**जालना । प्रतिनिधी -** येत्या २० सप्टेंबर शुक्रवारपासून जालना येथे तीन दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकरी बांधवांना नवीन तंत्रज्ञानाची ओळख होऊन उत्पादन वाढीसाठी नेमक्या कोणत्या तंत्राचा वापर केला पाहीजे हा या महोत्सव आयोजना मागील उद्देश असल्याची माहीती कृषी महोत्सवाचे मुख्य संयोजक आ.कैलास गोरंट्याल यांनी दिली. शहरातील फ्रेजर बॉईज हायस्कुलच्या मैदानात आयोजित करण्यात आलेल्या या कृषी महोत्सवाचे उदघाटन दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ. नानाभाऊ पटोले यांच्याहस्ते करण्यात येणार असून अध्यक्षस्थानी विधान सभेतील विरोधी पक्षनेते विजयी वडेट्टीवार हे राहणार आहेत. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, खा. डॉ. कल्याण काळे, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पा.दानवे यांची या महोत्सवास विशेष उपस्थिती राहणार आहे. माजी मंत्री आ. राजेश टोपे, आ. बबनराव लोणीकर, आ. राजेश राठोड, आ. संतोष दानवे, आ. नारायण कुचे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी म.रा.कापसे, महीको सिडसचे रितेश मि श्रा, कलश सिडसचे समीर अग्रवाल, कृषी तज्ञ विजयअण्णा बोराडे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.निसार देशमुख यांची यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थिती राहणार आहे. दरम्यान, या तीन दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या निमित्ताने परिसंवाद, चर्चासत्र आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले असून परिसंवाद व चर्चासत्रांच्या माध्यमातून शेतकर्यांना तंज्ञाचे मार्गदर्शन लाभणार आहे. त्यात शुक्रवार दि. २० सप्टेंबर रोजी म्हणजेच पहील्या दिवशी सायंकाळी ५ ते ६.३० या वेळेत महाराष्ट्राची लोकधारा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २१ सप्टेबर रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत सेंद्रीय शेती , नैसर्गिक शेती या विषयावर खरपुडी येथील कृषी विज्ञान केंद्रातील विषय तज्ञ डॉ. राहुल चौधरी हे उपस्थित शेतकर्यांना मार्गदर्शन पान २ वर

# शिवसेना नेते माजी मंत्री अर्जुन खोतकर यांच्याकडून शहरातील श्री गणेश मुर्ती विसर्जन स्थळाची पाहणी

## महापालिका आयुक्त व कर्मचाऱ्यांना उपाययोजना बाबत दिल्या सूचना

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना नेते माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनी सोमवार (दि. १६) रोजी दुपारी तीन वाजेच्या दरम्यान जालना शहरातील गणपती विसर्जन स्थळाची पाहणी केलीय. जालना महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसह अर्जुन खोतकर यांनी आज शहरातील मोती बाग येथील मोती तलावाची पाहणी केलीय. १० दिवस पाहुणचार घेतल्या नंतर उद्या १७ सप्टेंबर रोजी लाडका बाप्पा भक्तांचा निरोप घेणार आहे. त्या अनुषंगाने गणेश विसर्जनच्या पार्श्वभूमीवर आज अर्जुन खोतकर यांनी म ोती तलावाची पाहणी करत महापालिका कर्मचाऱ्यांनी योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच पान २ वर



# मुर्तींचे पर्यावरणपुरक विसर्जनासाठी सहकार्य करण्याचे मनपाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** अनंत चतुदर्शीच्या दिवशी मंगळवार (दि १७) रोजी श्रीगणेशाच्या मूर्तीचे विसर्जन होणार आहे. जालना शहरातील घरगुती व सार्वजनिकरित्या स्थापन झालेल्या श्रीगणेशांचे विसर्जनासाठीची तयारी जालना शहर महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे. पर्यावरणपुरक विसर्जन होण्यासाठी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, घरगुती श्रीगणेशाच्या मूर्तीचे विसर्जन महानगरपालिकेने मोती तलावाजवळ निर्माण केलेल्या कृत्रिम कुंडामध्येच करावयाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत घरगुती गणेश मूर्तीचे विसर्जन कोणत्याही सार्वजनिक पाणवठयावर उदा. मुक्तेश्वर तलाव, घाणेवाडी तलाव, बंधारे याम ध्ये करावयाचे नाही. सार्वजनिक व मोठया आकाराच्या गणेशम ूर्तींच्या विसर्जनासाठी औरंगाबाद चौफुली-एमआयडीसी रोड मार्गे मोती तलाव या ठिकाणी व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी केवळ सार्वजनिक गणेश मंडळांनाच परवानगी असुन घरगुती गणेश मुर्ती या ठिकाणी विसर्जित करु नयेत. विसर्जन स्थळावर निर्माल्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. त्या व्यवस्थेचा वापर करावा. परिसरात निर्माल्य पसरणार नाही याची दक्षता घ्यावी. मनपा कर्मचारी, पोलीस विभाग व स्वयंसेवी संस्था यांच्या सुचनांचे पान २ वर

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले मात्र मराठवाडा प्रांत हा पारतंत्र्यातच होता. पूर्वी मराठवाडा हैदराबाद संस्थांनात विलीन होता. हैदराबाद संस्थानावर निजाम उर उस्मान अली खान निजाम उल मुल्क आसफजाह याचे राज्य होते. निजामाने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यास स्पष्ट नकार दिला होता. मात्र हैदराबाद संस्थानातील जनता भारतात सामील होण्याच्या बाजूने होते. निजामाच्या संस्थानातून मुक्त होऊन भारतीय संघ राज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैदराबाद संस्थानात मुक्ती संग्राम आंदोलन सुरू झाले. हैदराबाद संस्थानाची लोकसंख्या त्यावेळी दीड कोटीच्या वर होती. या संस्थांनात तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकचा काही भाग होता. मुक्ती संग्राम सुरू झाल्यावर निजामाचा सेनापती कासीम रिझवी याने जनतेवर खूप अत्याचार केले. दुसऱ्या बाजूला स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, बाबासाहेब परांजपे यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य संग्राम वेगात सुरू होता. मराठवाडा मुक्ती संग्राम मराठवाड्यातील गावागावात लढला जात होता. यात हजारो स्वातंत्र्य सैनिक पुढे आले. स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रदीर्घ लढ्यानंतरही निजाम शरण येत नाही. उलट जनतेवरील अन्याय अत्याचार वाढतच आहे. हे पाहून १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद संस्थानात पोलीस कारवाई सुरू केली. सरदार वल्लभभाई पटेल हे त्यावेळी भारताचे गृहमंत्री होते. त्यांच्या धाडसी आणि अचूक निर्णयाने जनतेस न्याय मिळाला. मुख्य फौजा सोलापूरकडून घुसल्या. पहाटे चार वाजता कारवाई सुरू झाल्यावर २ तासात नळदुर्ग व सांयकाळ पर्यंत तुळजापूर, परभणी ते मणीगड, कनेरगाव भारतीय फौजांनी सर केले. चाळीसगावहुन निघालेल्या फौजेने कन्नड, दौलताबाद काबीज केले. १५ सप्टेंबर रोजी औरंगाबाद सर करून भारतीय फौजा पुढे निघाल्या. भारतीय फौजांपुढे निजामच्या फौजेचे काही चालले नाही. अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाचा सेनाप्रमुख जनरल अल इद्रीस याने शरणागती पत्करली. सेनाप्रमुखच शरण गेल्याने निजामही शरण आला. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या गुलामीतून मुक्त झाले. हैदराबाद संस्थानावर तिरंगा फडकला. निजामाच्या अन्यायी राजवटी विरुद्धचा लढा मराठवाड्यातील जनतेने यशस्वी केला. तेंव्हापासून आजचा दिवस म्हणजे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम म्हणून साजरा केला जातो. मराठवाडा मुक्ती संग्रामात ज्या ज्ञात अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्या स्वातंत्र्य सैनिकांना मानाचा मुजरा.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# शासनयंत्रणेचा ताबा घेणे हे कामगारांचे ध्येय असावे

सध्या २०२४ च्या सप्टेंबर महिन्यातील द्वितीय पंधरवड्यात अवलोकन करीत असताना या महिन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या अनुषंगाने नेमका काय संदेश दिला आहे? याचा विचार केला असता प्रामुख्याने दोन महत्त्वपूर्ण बाबींचा उल्लेख करणे अनिवार्य ठरेल असे मला वाटते. त्यातील पहिले असे की, १५ सप्टेंबर १९३८ ला काँग्रेस सरकारने मुंबई कायदेमंडळात आणलेल्या कामगारांच्या नागरिक स्वातंत्र्यास विघातक अशा ट्रेड डिस्प्युट बिलाच्या पहिल्या वाचन प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय मुद्देसूद संदेश दिला होता. त्याप्रसंगी ते म्हणाले होते की, कामगारावर गुलामगिरीचे बंधने लादणे हे लोकशाहीचे विडंबन होय. तर दुसरी बाब अशी की, ८ ते १७ सप्टेंबर १९४३ च्या दरम्यान 'द इंडियन फेडरेशन ऑफ लेबर' या संस्थेच्या वतीने 'द ऑल इंडिया ट्रेड युनियन स्टडी कॅम्प' चे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी समारोपिय सत्रात १७ सप्टेंबर १९४३ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, शासन यंत्रणेचा ताबा घेणे कामगारांचे ध्येय असावे. या ऐतिहासिक संदेशाला आजच्या संदर्भात तपासून पाहण्याची नितांत आवश्यकता आहे.



१५ सप्टेंबर १९३८ ला काँग्रेसने ट्रेड डिस्प्युट बिल का आणले? याचा विचार केला असता हे लक्षात येते की, १९३४ मध्ये संप बंदी कायदा अस्तित्वात आला होता. ज्यात तडजोड घडवून आणणारी एखादी संस्था स्थापण्याकरिता हे बील पास करण्यात आले होते. मात्र यात केली जाणारी तडजोड ही ऐच्छिक होती. तर त्यावेळी म्हणजे १५ सप्टेंबर १९३८ ला सादर केलेल्या बिलात ही तडजोड सक्तीची केली जाणार होती. सर रॉबर्ट बेल यांनी पहिल्यांदा सादर केलेल्या बिलात सुद्धा सक्तीची तरतूद केली होती, परंतु पास करताना मात्र ऐच्छिक ठेवली. त्यामुळे बदलत्या काळानुसार संपक-यांची वाढती मागणी लक्षात घेऊन त्यांना ती सक्तीची करणे आवश्यक वाटले होते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आकडेवारीसह संपात भाग घेतलेल्या कामगारांची संख्या व फुकट गेलेल्या दिवसाची संख्या हे कालपरत्वे कमी कमी होत गेली असल्याचे स्पष्ट केले. ज्यामुळे त्यांना ते कारण पटण्यासारखे नसल्याचे जाहीर केले होते.

त्या बिलातील ६२ व्या प्रकरणानुसार संप करण्याचा अधिकार नाकारून संपक-यांना शिक्षेची तरतूद करण्यात आली होती. त्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खंडण करताना स्पष्ट केले आहे की, संप करणे म्हणजे नौकरीचा करार मोडणे होय. करार मोडणे हा गुन्हा असला तरी तो फौजदारी स्वरुपाचा गुन्हा होऊ शकत नाही. अशावेळी हा गुन्हा दिवाणी स्वरूपाचा मान्य केल्यास या गुन्ह्यामुळे ज्या कामगारांचे नुकसान होणार आहे त्यांना भरपाई मिळायला पाहिजे. या अनुषंगाने १८५९ ला ब्रीच ऑफ कॉनिट्रॅक्ट कायदा अस्तित्वात ( ईशरलह `ष उेपीीरलीं) आला होता. ज्याची फारशी अंमलबजावणी झाल्याचे आढळून येत नाही.

कामगारांना संपाचा हक्क नाकारणे म्हणजे त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध काम करायला लावून गुलाम बनविण्यासारखेच होते. ज्यामुळे त्यांच्या हक्काला बाधा पोहोचते. म्हणून कामगारांचा संप हा कुठल्याही कायद्याने बेकायदेशीर ठरू शकत नाही. मात्र या बिलात संप करणे हा गुन्हा ठरवून काँग्रेस सरकारने कामगारांवर गुलामगिरी लादण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या बिलाचे नामकरण 'कामगारांचे नागरिक स्वातंत्र्य हिरावून घेणारा' कायदा असे केले होते. जिथे कामगारांच्या लोकशाही मूल्यांवर गदा आणली जाते तिथे लोकशाही नाकारली जात असल्याने कामगारांवर गुलामगिरीची बंधने लादने हे लोकशाहीचे विडंबन होय. असे बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते.

पुढे जाऊन १७ सप्टेंबर १९४३ ला द ऑल इंडिया ट्रेड युनियन वर्क्स स्टडी कॅम्पच्या समारोपिय सत्रात बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, संसदीय लोकशाहीत कायदेमंडळ व कार्यकारी मंडळावर अंकुश ठेवण्यासाठी न्यायपालिकेची व्यवस्था असताना सुद्धा इटली, स्पेन, जर्मनी सारख्या राष्ट्रात या विरोधात बंड का करण्यात आले होते? याची शहानिशा करण्याची आवश्यकता आहे. तरीही याची भारतीय परिप्रेक्ष्यातून बघता त्याची गरज असल्याचे नमूद केले आहे. अशा प्रकारची संसदीय लोकशाही हुकुमशाही राष्ट्रात अयशस्वी ठरत असते. ज्यात प्रबळ सत्ताधारी दुर्बलावर अन्याय करीत असल्याने सामाजिक समता प्रस्थापित होण्यासाठी अडसर निर्माण होतो. ज्यामुळे गरिबांच्या दु:खात आणखी भर घातली जाते. परिणामी सामाजिक व आर्थिक समता नसल्यास केवळ राजकीय समतेचा फारसा उपयोग होत नसतो. संसदीय लोकशाहीत समतेचे महत्त्व न कळाल्याने स्वातंत्र्य व समतेचा मेळ बसू शकला नाही म्हणून जेवढी समता कमी झाली तेवढीच विषमता वाढली परिणामी ही दरी रुंदावतच गेली. मात्र इंग्लंड, अमेरिकेसारख्या राष्ट्रात याचे चांगले परिणाम पहायला मिळतात कारण त्यांनी समाजात समता स्थापित करण्याच्या दृष्टीने गरीब व श्रीमंतातील दरी त्या प्रमाणात कमी केलेली आहे. हे मानवीय शहाणपणाचे लक्षण आहे. करिता रुसोचे 'सामाजिक करार', मार्क्सचा 'कम्युनिस्ट जाहीरनामा', १३ व्या पोपसह लियोची 'कामगारांची स्थिती' व जॉन स्टुअर्ट मिलचे 'स्वातंत्र्य' ही चार मूलभूत पुस्तके कामगारांसह सर्वांनीच वाचली पाहिजेत असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सल्ला दिला असून सत्ता संपादन करणे हेच एकमेव ध्येय कामगारांनी ठेवले पाहिजे. अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

यावर सद्यस्थितीत विचार करताना सरकारने ४४ कामगार कायद्यांचे ४ कायद्यात रुपांतर करून कामगारांच्या कामाचे तास वाढविणे, नेमक्या ठराविक पगारावर कामगार नेमताना त्यांना काम सोडून जाता येऊ नये. अशी बंधने लादणे, किमान वेतन मिळण्याची अंमलबजावणी न करणे व कत्राटीकरणाचा घाट घालून प्रत्यक्ष काम करणाऱ्यांना त्यांच्या हक्काचा मेहनताना न मिळू देणे इत्यादी तरतूदी करून भारताचे संविधानात अंतर्भूत असलेले कामगारांचे हक्क अधिकार हिरावून घेतले जात आहेत काय? या अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी प्रयत्न करने ही आपली सर्वाचीच जबाबदारी व कर्तव्य आहे. ती आपण पार पाडली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करून मी माझ्या लेखणीला तात्पुरत्या स्वरुपात विराम देतो.



**बी. बी. मेश्राम, संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व नॅशनल कौन्सिल मेंबर ऑफ दि नाग असोसिएशन (आईना). ९४२१६७८६२८**

## पान १ व ३ वरुन

### श्रीकृष्ण आपल्याला ...

उपलब्ध करून देण्यासाठी तत्पर असेल असा शब्द आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित यांना दिला

यावेळी आचार्य महंत दुधगावकर बाबा परभणी, महंत कृष्णराज बाबा साळकर केंधळी, महंत सुदामराज शास्त्री महाराज, महंत बलदेवराज बाबा बाभुळगावकर, महंत भारतबाबा भोजने, महंत अभिमन्यू बाबा साळकर, महंत मालनताई साळकर, पंडितराव भुतेकर, संदीपभैय्या गोरे, प्रल्हादराव बोराडे, पंजाबराव बोराडे, कैलासराव बोराडे, नागेशराव घारे, बाबूरावजी शहाणे, राजाभाऊ खराबे, दत्ताराव खराबे, बाळासाहेब तौर, प्रभाकर चव्हाळ, श्रीदेव खरात, पद्माकर कवडे, रमेश राठोड यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

### गाडगेबाबा घाणेवाडी ...

उद्योजक सुनील रायठठ्ठा, उदय शिंदे,ओमप्रकाश चितळकर उपस्थित होते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून जालना शहरासह परिसरातील बावीस गावे आणि शेतीला पाणी पुरवणारा तलाव ही आपली ऐतिहासिक धरोहर आहे. आपल्या पूर्वजांच्या कर्तृत्वाची ही निषाणी आहे.याचे शास्त्रशुद्ध पध्दतीनुसार जतन आणि संवर्धन करण्याचे काम लोकसहभागातून घाणेवाडी जलसंवर्धन मंचाच्या नेतृत्वाखाली चालते. हा आदर्श संपूर्ण राज्यभरात घेण्याची गरज असल्याचे खा.डॉ.काळे यावेळी बोलतांना म्हणाले.

घाणेवाडी तलावाचे दोन्ही सांडवे तात्काळ दुरूस्त करून तलावाच्या भिंतीवरील पिचींग दुरूस्त करण्याची गरज असल्याचे भाईश्री रमेशभाई पटेल यांनी सांगितले. लोकसहभागातून यंदाच्या वर्षांत पाच लाख ट्रॅक्टर गाळ काढून परिसरातील शेतकऱ्यांना देण्यात आल्याची माहीती उद्योजक सुनील रायठठ्ठा यांनी यावेळेस दिली घाणेवाडीतील गाळ काढून कुंडलिका नदीपात्रात मोठ्या विहिरीतून पाणी उपलब्ध झाल्यास जायकवाडी धरणातून अतिशय अल्प प्रमाणात पाणी घेण्याची जालना शहराला गरज असेल असे जलतज्ज्ञ सुरेश खानापूरकर यांनी सांगितले. जालना शहरातील विविध क्षेत्रातील समस्यांवर उपाय शोधण्यासाठी शहरातील विविध सामाजिक व सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह बैठक घेणार असल्याचे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी सांगितले.

### चर्मकार समाजाच्या ...

यांच्या मार्फत मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना अखिल भारतीय गुरु रविदास परिवर्तन सेनेचे संस्थापक अध्यक्ष देवीलाल बिरसोने यांनी या निवेदनात म्हटले आहे.

दिनांक १८ /१२ /२०२३ रोजी दिलेले निवेदन, दिनांक १९/ ६/ २०२४ रोजी दिलेले निवेदन, दिनांक २५/ ६/ २०२४ रोजी दिलेले निवेदन ,दिनांक ३ /७ /२०२४ रोजी दिलेले निवेदन असे अनेक निवेदनं दिले परंतु आतापर्यंत या निवेदनाची कोणतीच दखल घेतली गेली नाही यापूर्वी अनेक निवेदन लेखी स्वरुपात दिलेले असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की चर्मकार समाजाच्या काही प्रमुख मागण्या यामध्ये प्रामुख्याने १)चर्मकार समाजाला २५ लाख रुपये पर्यंत कर्ज संत रोहिदास चर्म उद्योग आर्थिक विकास महामंडळ तर्फे एन. एस. एफ. डी .सी. मार्फत देण्यात यावे. २) संत रोहिदास चर्म उद्योग आर्थिक विकास महामंडळा अंतर्गत देणारे कर्जाची अट शिथिल करण्यात यावी.३) संत रोहिदास आर्थिक विकास महामंडळाला करून देण्यात आलेली तुटपुंज्या स्वरूपाची कर्जमाफी २०२२ पर्यंतचे कर्ज माफ करण्यात यावे.४) चर्मकार समाजाला सेवाधारक घोषित करून त्यांना हक्काचे घर देण्यात यावे.५) जालना शहरांमध्ये संत शिरोमणी गुरु रविदास सभागृह स्वतंत्र चर्मकार समाजासाठी खासदार निधी/ आमदार निधीतून बनवून देण्यात यावे.६) जालना महानगरपालिका तर्फे स्टॉल टाकण्यासाठी पीच परवाने देण्यात यावे.या मागण्यांचा समावेश या निवेदनात करण्यात आला आहे.या निवेदनावर अखिल भारतीय गुरू रविदास परिवर्तन सेनेचे संस्थापक अध्यक्ष- श्री देवविलाल बिरसोने, जालना महानगर अध्यक्ष संतोष डोंगरे शहर युवा -अध्यक्ष अनिल भगुरे ,काशिनाथ जाटवे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### जालन्यात शुक्रवारपासून ...

करणार आहेत. दुपारी १२ ते १ या वेळेत सोयाबीन, तुर लागवड तंत्रज्ञान या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील कृषी विस्तार विद्यावेता डॉ. सुर्यकांत पवार हे मार्गदर्शन करणार असून सायंकाळी ५ ते ६.३० या वेळेत शालेय विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शन, गायन, नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दि. २२ सप्टेंबर रविवार रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत कृषी अन्न प्रक्रिया उद्योग व विक्री व्यवस्थापन या विषयावर जालना जिजामाता कृषीभुषण पुरस्कार प्राप्त उद्योजिका सौ.सिताबाई मोहीते या मार्गदर्शन करणार असून दुपारी १२ ते १ या वेळेत सिताफळ लागवड तंत्रज्ञान या विषयावर जाफराबाद तालुक्यातील नळविहीरा येथील अ‍ॅग्रो व्हिजन गट शेती संघाचे अध्यक्ष संजय मोरे हे मार्गदर्शन करणार असून सायंकाळी ५ ते ६.३० या वेळेत खेळ पैठणीचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दि. २३ सप्टेबर सोमवारी दुपारी ३ ते ४ या वेळेत मोसंबी तंत्रज्ञान या विषयावर बदनापूर येथील मोसंबी संशोधन केंद्रातील डॉ. संजय पाटील सोयगावकर हे मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी ४ ते ५ या वेळेत महिला सक्षमीकरण या विषयावर सौ. योगिताताई खांडेभराड या महिलांना मार्गदर्शन करणार आहेत तर सायंकाळी ५ ते ९ या वेळेत महाराष्ट्राची लोककला या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जालन्यासह मराठवाड्यातील शेतकरी बांधवांनी या तीन दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवास उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन कृषी महोत्सवाचे मुख्य संयोजक आ. कैलास गोरंट्याल यांनी केले आहे.

### शिवसेना नेते ...

कोणीही गणेश विसर्जन साठी खोल पाण्यात जाणार नाही यासाठी महापालिका कर्मचाऱ्यांनी विशेष काळजी घेऊन योग्य तो पोलिस बंदोबस्त विसर्जन स्थळी तैनात करण्यात यावा अशा सूचना यावेळी खोतकर यांनी दिल्या आहेत. यावेळी युवा सेनेचे राज्यसचिव अभिमन्यू खोतकर मेघराज चौधरी या युवा सेना शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुर्तींचे पर्यावरणपुरक ...

पालन करावे. विसर्जन स्थळावरील बॅरिकेटींगच्या पुढे तलावाकडे जाण्यास प्रतिबंध करण्यात आला असुन नागरिकांनी सहकार्य करावे. विसर्जन स्थळी व मार्गावर कोणताही अनुचित प्रकार किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची सर्व गणेश भक्तांनी काळजी घ्यावी व सहकार्य करावे.

### मराठवाडा मुक्ती गाथा ...

निझामाची बाजू घेऊ नये असे आवाहन केले होते.

**वंदे-मातरम् विद्यार्थी चळवळ**

हैद्राबाद संस्थांनात शिक्षण संस्थांमध्ये वंद्मातरम् गीत म्हणण्यास बंदी होती. मुक्ती लढ्याचे पडसाद विद्यार्थ्यांच्या मनावर उमटू नयेत, म्हणून निजाम सरकार प्रयत्नशील होते. इ.स. १९३८ हे वर्ष प्रतिकाराचे वर्ष होते. विद्यार्थी वर्गाच्या मनात असंतोष खदखदत होता. उस्मानिया विद्यापीठात वरंगल, गुलबर्गा व औरंगाबाद येथे इंटरमिजिएट कॉलेजेस होती. औरंगाबाद कॉलेजमध्ये विद्यार्थी बैचेन होते. गोविंदभाई श्रॉफ विद्यार्थ्यांना चिथावणी देतात म्हणून त्यांना नोकरीतून काढण्यात आले. १४ नोव्हेंबर, १९३८ रोजी विद्यार्थ्यांनी वसतिगृहामध्ये 'वंदेमातरम्' म्हणण्यास प्रारंभ केला. त्यावर सरकारने बंदी आणली. कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थी ऐकायला तयार नव्हते. १६ नोव्हेंबर, १९३८ रोजी विद्यार्थ्यांनी अन्नत्याग सत्याग्रह केला. १८ नोव्हेंबर, १९३८ रोजी विद्यार्थ्यांची या प्रश्नावर रितसर बैठक झाली आणि ३० नोव्हेंबर, १९३८ रोजी विद्यार्थ्यांनी संप पुकारला. या घटनेचे पडसाद हैदराबादमध्येही उमटले. विद्यार्थ्यांना गणवेशाची सक्ती करण्यात आली. त्यास देखील विद्यार्थ्यांनी प्रखर विरोध केला. शेवटी वंद्मातरम् प्रश्नावर बेमुदत संप पुकारला. एकूण १ हजार २०० विद्यार्थी संपावर गेले. केवळ औरंगाबाद शहरात ३०० विद्यार्थी वंदेमातरम् चळवळीत उतरले होते. वंद्मातरम् आंदोलनात सहभागी झालेल्या अनेक विद्यार्थ्यांना कॉलेजमधून काढून टाकण्यात आले. विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडीत झाले. नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू टी. जे. केदार यांनी उदार अंत:करणाने उस्मानिया विद्यापीठातील काढून टाकलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला. मराठवाड्यातील शालेय विद्यार्थ्यांची येवला, खामगाव व अहमदनगर येथे सोय करण्यात आली. त्रिपुरा कांग्रेस अधिवेशनात वंदेमातरम् चळवळीस पाठिंबा देण्यात आला. नेताजी सुभाषचंद्र बोस व पं. जवाहरलाल नेहरू यांनी तरुणांच्या या उठावाला पाठिंबा दिला होता.

विद्यार्थ्यांनी दिलेल्या या अभूतपूर्व लढ्यामुळे हैदराबाद संस्थांनात पुढे जी आंदोलने झाली, त्यासाठी राजकीय कार्यकर्ते व नेते वंदेमातरम् चळवळीतून मोठ्या प्रमाणात मिळाले. वंदेमातरम् चळवळीने विद्यार्थी विश्वात फार मोठी जागृती घडवून आणली. १९३८ ते १९४८ पर्यंतचा काळ हा मुक्ती संग्रामाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या काळात सर्व आघाड्यांवर बहुतेक वंदेमातरम् चळवळीतील तरुण कार्यकर्ते होते. हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात आणि मराठवाडा मुक्ती संग्रामात विद्यार्थी व युवाशक्तीने वंदेमातरम् चळवळीच्या माध्यमातून जे अभूतपूर्व चैतन्य दाखवले , ते प्रशंसनीयच मानले पाहिजे!!

**'रझाकार' चा उदय आणि सशस्त्र लढा सुरु**

निजाम सरकारने स्टेट काँग्रेसचे वाढता जनाधार लक्षात घेऊन तसेच भारतीय काँग्रेस त्या काळी महात्मा गांधींच्या नेतृत्वात शेवटच्या माणसापर्यंत पोहचली होती. म्हणून हैद्राबाद स्टेट काँग्रेस हे नाव नको म्हणून निजामानी हैद्राबाद स्टेट काँग्रेसवर बंदी आणली. तर दुसरीकडे १० एप्रिल, १९३९ रोजी सत्याग्रहीची मुक्तता करण्यात आली. स्टेट काँग्रेसचे काँग्रेस हे नाव बदलले तर स्टेट काँग्रेसवरील बंदी उठवू, असे निजाम सरकारचे म्हणणे होते. वाटाघाटीतून किंवा तडजोडीद्वारे काही निष्पन्न होत नव्हते. परंतु, जहालांनी मात्र महात्मा गांधीजींकडे आंदोलनाची मागणी केली. महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाला मान्यता दिली. महात्मा गांधींनी स्वतः पाच नेत्यांची निवड केली. त्यात स्वामी रामानंद तिर्थ , हिरालाल कोटेचा (बीड), देवरामजी चव्हाण (उस्मानाबाद), अच्युतभाई देशपांडे (औरंगाबाद), मोतीलाल मंत्री (बीड) यांचा समावेश होता.

'चलेजाव' व चळवळीत संस्थांनातील जनतेने निष्ठेने भाग घ्यावा, असा आग्रह होता. १६ ऑगस्ट, १९४२ रोजी स्वामीजींना नामपल्ली स्टेशनवर अटक करण्यात आली. स्वामीजी सोबतचे अन्य ३० नेतेही पकडण्यात आले. नांदेड, वैजापूर, गंगापूर, परभणी, सेलू, उस्मानाबाद, बीड, अहमदपूर, जालना, अंबड इत्यादी गावाच्या सत्याग्रहींना तुरुंगात डांबण्यात आले. १९४२ च्या लढ्याचे तीव्र पडसाद संपूर्ण मराठवाड्यात उमटले. अंबाजोगाईच्या योगेश्वरी शाळेतील शिक्षकांवर कठोर कारवाई करण्यात आली. १९४२ ची चळवळ शमल्यानंतर सुमारे १० महिन्यांनी सत्याग्रहींना हळूहळू सोडण्यात आले. स्वामी रामानंद तीर्थांचीही जेलमधून सुटका करण्यात आली. निजाम सरकार चळवळी दडपण्याचा एकीकडे प्रयत्न करत होते, तर दुसरीकडे भुमिगत राहूनही लोक गुप्तपणे संघर्ष करतच होते. १९४२ च्या लढ्यामुळे संस्थांनातील लढ्याला गतिमानता प्राप्त झाली. स्वातंत्र्यवादी शक्तीचे प्रबळ संघटन झाले. स्टेट काँग्रेसवरील बंदी उठवण्याचा आग्रह धरण्यात आला. वाढत्या दडपशाहीला तोंड देण्याच्या दृष्टीने जहाल आंदोलनाच्या प्रयत्नात होते.

१९४३ पासून जहाल गट महाराष्ट्र परिषदेत प्रभावी बनला. सर्व जिल्ह्यात अनेक कार्यकर्ते रात्रं-दिवस राबत होते. बीदर, गुलबर्गा तसेच सीमावर्ती प्रदेशातही मराठवाड्याने कार्यकर्ते पुरवले होते. व त्या भागात संघटन कार्य विकसित केले. माणिकचंद पहाडे, व आ. कृ. वाघमारे यांनी तालुका व जिल्हा पातळीवर अधिवेशने घेवून शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. गोविंदभाई श्रॉफ, स. कृ. वैशंपायन, आ.कृ. वाघमारे यांनी तिन्ही विभागातील परिषदांचे काम एकत्रित केले. १५ नोव्हेंबर, १९४५ रोजी प्रांतिक परिषदांच्या कार्यकारी मंडळांचे संमेलन घेण्यात आले. स्टेट काँग्रेसवरील बंदी उठवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले.

**लोक सहभाग आणि सशस्त्र आंदोलन**

३ जुलै, १९४६ रोजी स्टेट काँग्रेसवरील बंदी उठवण्यात आली, त्रिपुरा, रामगड आणि उदयपूर येथील अखिल भारतीय कांग्रेसच्या अधिवेशनात हैदराबाद संस्थांनातील प्रश्नाबाबत सविस्तर चर्चा झाली होती. राज्य चालविताना हैद्राबाद संस्थांन धर्माचा आधार घेतं व न नागरी स्वातंत्र्य नाकारते असे मत पंडित नेहरूंनी उदयपूरच्या काँग्रेस अधिवेशनात व्यक्त केले होते. १९४६ ते १९४८ च्या कालखंडात हैदराबादचा लढा अधिक तीव्र बनत गेला. दि. १६ व १७ ऑगस्ट १९४६ ला स्टेट काँग्रेसची हैदराबादला बैठक झाली. दीड लाख सभासद व एक लाख रुपयांची वर्गणी जमा करण्याचा संकल्प स्टेट काँग्रेसने केला होता. १९४६ च्या अखेरीस परभणी येथे महाराष्ट्र परिषदेच्या स्थायी समितीची बैठक होऊन त्यात महाराष्ट्र परिषदेचे स्टेट काँग्रेसमध्ये विलीनीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

हैद्राबाद संस्थांनात 'रझाकार ' संघटनांची वाढ कासीम रझवी इत्तेहादुल मुसलमीन संघटनेचा अध्यक्ष झाल्यानंतर झाली. रझाकार ही निमलष्करी संघटना होती. या संघटनेस निजामच्या वैयक्तिक कोषातून आर्थिक साह्य मिळत असे. कासीम रझवी सोबतच संस्थानात अतिरेक्यांचे गटही उदयास आले. कासीम रझवीने आपल्या प्रतिस्पर्ध्याचा घात करून हुकूमशाही प्रस्थापित केली होती. रझाकारांचा वापर करून संस्थांनात दहशतीचे वातावरण निर्माण केले होते. संस्थांनातील प्रजा व रझाकारांचे संघर्ष सातत्याने घडत होते. त्यातून अर्जापूर (जि. नांदेड) गावाजवळ गोविंदराव पानसरे यांचा २९ ऑक्टोबर, १९४६ रोजी रझाकाराने खून केला. पानसरे एक निष्ठावान गांधीवादी होते. नांदेड जिल्ह्यातील अनेक तालुक्यांत ते संघटितपणे कार्य करत असत . पानसरे हे संस्थानातील स्टेट काँग्रेसचे पहिले 'हुतात्मा' ठरले. अर्जापूर गोळीबारात पानसरे सोबतच अन्य चार जण प्राणाला मुकले.

स्टेट काँग्रेसची बंदी उठल्याबरोबर हैदराबाद संस्थांनातील जहाल आणि मवाळ गटातील संघर्ष वाढत गेला. बिदर येथे १ जानेवारी, १९४७ रोजी झालेली स्टेट काँग्रेसच्या स्थायी समितीची बैठक खूप गाजली. मवाळ व जहाल गटाच्या नेत्यांनी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप केले. त्यातून स्टेट काँग्रेसचे जुने स्थायी व कार्यकारी मंडळ बरखास्त करण्यात आले. पुन्हा नवीन स्थायी समिती निर्माण करण्यात आली. तिच्या अध्यक्षपदी स्वामी रामानंद तीर्थ यांचीच निवड झाली. स्वामीजी नव्याने अध्यक्ष झाल्यानंतर स्वामीजींनी अंतर्गत भांडणे स्थगित करून कार्यक्रमावर भर दिला. स्वामीजींच्या प्रयत्नांमुळे स्टेट काँग्रेसचे २ लाख २५ हजार सभासद नोंदवले गेले. त्यानंतर स्टेट काँग्रेसच्या रीतसर निवडणुका घेण्यात आल्या. त्यात स्वामीजींचा गट प्रचंड बहुतमताने निवडून आला. मवाळ गटाचे नेते बी. रामकिशनराव पराभूत झाले. आणि या लढ्याचे नेतृत्व स्वाभाविकपणे स्टेट काँग्रेसकडे आले!!

**जिल्हा माहिती अधिकारी, लातूर.**

# मराठवाडा मुक्ती गाथा

मराठवाडा स्वातंत्र्य होऊन १७ सप्टेंबर रोजी ७४ वर्षे पूर्ण होऊन ७५ वर्षात प्रवेश करेल.. त्यानिमित्ताने मराठवाडा काय होता.. इथे निजामशाही कशी आली.. त्या निजामशाहीच्या काळात काय परिस्थिती होती. त्या हुकूमशाही विरोधात जो लढा उभा राहिला तो कसा उभा राहिला आणि अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी हा भाग निजामशाहीच्या जोखडातून मुक्त झाला ते आपण.. आज पासून रोज सतरा सप्टेंबर पर्यंत जाणून घेऊ या.!!

**मराठवाडा हे नाव कसे पडले**

सम्राट अशोकाच्या १६ महाजनपदा पैकी दोन महाजनपदे एक अश्मक आणि दुसरे मूलक हे गोदावरीच्या खोऱ्यात नांदणारी.. हे दोन्ही महाजनपदात बहुतांश लोकं महाराष्ट्री प्राकृत बोलणारी.. सातवाहन राजा हाल यांनी ७०० गाथा एकत्र करून संपादित केलेला गायासप्तशती म्हणजेच गाथा सप्तशती ही प्राकृत मधून असलेली निर्मिती यात या गोदावरी खोऱ्यातील लोकांचे लोक जीवन प्रतिबिंबीत झाले आहे. यातून एकच ध्वनीत होते की हा प्रदेश म्हणजे मराठीचे आद्य रूप महाराष्ट्री प्राकृत बोलणारा प्रदेश पुढे अनेकांनी या प्रदेशावर आपली हुकूमत गाजवली आणि १७२४ मध्ये दिल्लीची सुभेदार निजाम उल मुल्क या निजाम शहाने हैद्राबाद मध्ये निजामशाही स्थापन केली. यात तीन भाषा बोलणारे प्रदेश होते.. एक तेलगू ( आंध्र ), कन्नड ( कर्नाटक ) आणि मराठी ( मराठवाडा ).. यात लातूर म्हणजे पूर्वाश्रमिचा उस्मानाबाद जिल्हा मराठी बोलणाऱ्या लोकांचा शेवटचा भाग.. म्हणजे निजामाच्या काळात भाषे प्रमाणे प्रदेशाची नावे झाली आणि मराठी बोलणाऱ्या लोकांचा मराठवाडा हे नाव कायम झाले.

**निजामाला मराठ्यांची मदत अन निजामानी शब्द फिरवला**

२७ डिसेंबर १७३२ रोजी बाजीराव पेशवे व चिम्माजी आप्पा आणि निजाम यांची लातूर पासून आठ मैलावर मांजरा नदीच्या काठी असलेल्या रुई - रामेश्वर येथे ऐतिहासिक भेट झाली. त्यामागची पार्श्वभूमी समजून घेणे महत्वाचे आहे. त्याशिवाय रुई - रामेश्वर भेटीचे महत्व अधोरेखित होणार नाही.

जंजिरा येथे सिद्दी आणि पोर्तुगीजांनी पश्चिम किनारपट्टीवर मराठा वर्चस्वाला आव्हान दिले. पण बाजीरावांच्या शत्रूंमध्ये सर्वात आघाडीवर होता निजाम उल मुल्क, दख्खनचा मुघल व्हाईसरॉय (हैदराबादचा). त्याला मुघल सम्राटांचे कमकुवत नियंत्रण देखील जाणवले आणि त्याला दख्खनमध्ये स्वतःचे स्वतंत्र राज्य स्थापन करायचे होते. निजाम उल मुल्कने मुघल-मराठा करार आणि दख्खनमध्ये चौथ गोळा करण्याच्या मराठ्यांच्या अधिकाराकडे दुर्लक्ष केले. दिल्ली दरबाराने मुघल-मराठा कराराची पुष्टी करूनही या प्रकरणाचा (१७२१ चा चिकलठाण चर्चा) शांततापूर्ण तोडगा काढण्याचे प्रारंभिक प्रयत्न अयशस्वी ठरले. कमकुवत दिल्ली दरबारही संदिग्ध धोरण खेळत होता. एकीकडे याने दख्खनमधील मराठ्यांचा चौथ संकलनाचा अधिकार मान्य केला, पण दुसरीकडे, निजाम उल मुल्कचे दख्खनमधील स्थान केवळ दख्खनमध्येच नव्हे तर गुजरातमध्येही वाढवून मजबूत केले.

**मुघलांच्या प्रभावाला आता ग्रहण लागले होते**. परंतु १७२२ मध्ये, मुघल सम्राट मुहम्मद शाह 'रंगीला' याच्यासमोर निजाम उल मुल्कच्या प्रादेशिक महत्त्वाकांक्षा उघड झाल्या आणि त्याला बाजूला केले जाऊ लागले. निजाम उल मुल्कने आता मुघल सम्राटाविरुद्ध उघडपणे बंड केले आणि त्याच्या प्रदेशांना हैदराबादची राजधानी असलेले स्वतंत्र राज्य घोषित केले. जेव्हा मुबारीझ खानच्या नेतृत्वाखालील शाही सैन्याने निजामाला ताब्यात घेण्यासाठी दख्खनच्या दिशेने कूच केले, तेव्हा त्यांनी आपल्या जुन्या शत्रूंकडे, म्हणजे मराठ्यांकडे मदत मागितली.

साखरखेर्डायाची लढाई मराठ्यांच्या उदयाची बुलढाणा जिल्ह्यात सिंदखेडराजा तालुक्यात साखरखेर्डा नावाचे गाव आहे. आज हे गाव विस्मरणात गेले असले तरी इ.स.१७२४ साली इतिहासाला कलाटणी देणारी एक महत्वाची घटना या गावात घडली आहे. इतिहासात हि घटना साखरखेर्ड्याची लढाई म्हणुन प्रसिध्द आहे. या लढाईमुळे मुघलांचे दक्षिणेतील वर्चस्व कायमचे संपले आणि मराठे व निजाम या दोन प्रबळ सत्ता म्हणून उदयास आल्या. छत्रपती शाहू महाराजांनी बाजीराव पेशव्यांना निजामाला मदत करण्यासाठी तुकडी पाठवण्याची सूचना केली. त्यांच्या सामूहिक सैन्याने १७२४ मध्ये साखरखेर्डा येथे शाही सैन्याचा पराभव केला. परंतु, त्याच्या स्वभावाप्रमाणे, धोका टळलेला पाहून निजाम उल मुल्कने १७१८ च्या मुघल-मराठा कराराचा सन्मान करण्यास नकार देऊन पुन्हा मराठ्यांना आव्हान दिले. मीठ चोळण्यासाठी निजाम उल मुल्कने कोल्हापुरचे छत्रपती संभाजी दुसरे , चंद्रसेन जाधव, उदाजी चव्हाण आणि राव रंभा निंबाळकर यांचा छत्रपती शाहूंच्या विरोधात युती केली. १७२७ मध्ये पेशवे आणि त्यांचे सैन्य चौथ गोळा करण्यासाठी गेले तेव्हा निजामाच्या सैन्याने त्यांना आव्हान दिले. मराठ्यांनी निजामाच्या सैन्याला वश करण्यात यश मिळवले आणि प्रत्युत्तरादाखल जालना, बुर्हाणपूर आणि खानदेश देखील लुटले.

**रुई - रामेश्वरला पेशवे - निजाम भेटी मागची कथा..!!**

दिल्लीचे मुघल साम्राज्य औरंगजेबाच्या मृत्यूनंतर फारसे प्रभावी राहिले नाही. शाहू महाराज १७०८ ला मराठी साम्राज्याचे छत्रपती झाले आणि मराठ्यांचा प्रभाव वाढता झाला. दिल्ली सलतनतवरही मराठ्यांचा दबाव वाढला, त्यातूनच १७१८ ला मुघल आणि मराठ्यात करार झाला.. त्यातून हैद्राबाद कडून चौथाई महसूल मराठ्यांना देण्याचे कबूल करण्यात आले. दिल्लीच्या कमकुवत तख्त फायदा घेत हैद्राबाद संस्थान कारभार बघणाऱ्या निजाम उल मुल्कने दिल्लीत आपले वजन वाढविले आणि गुजरात पर्यंत आपले पाय पसरले तो एवढ्यावर थांबला नाही दिल्लीच्या तख्ताला आव्हान देण्याची तयारी करून त्यासाठी मराठ्यांबरोबर दोस्ती करून १७२४ ला साखरखेर्डायाच्या लढाईत मराठ्यांच्या सहकार्याने दिल्लीच्या सलतनतचा पराभव केला. आपण मागच्या लेखात बघितले निजामाने १७१८ चा कराराचा सन्मान न राखता चौथाई देण्यास नकार दिला.. त्यातून मराठ्यांनी छोट्या मोठ्या चढाया केल्या. त्यातूनही निजाम शरण येत नाही हे बघून

२८ फेब्रुवारी १७२८ रोजी पहिल्या बाजीरावाच्या नेतृत्वाखाली मराठा साम्राज्य व हैदराबादचा निझाम यांच्यातील पालखेडच्या लढाईत मराठ्यांचा विजय झाला. महाराष्ट्रातील नाशिक शहराजवळ असलेल्या पालखेड येथील लढाई होती. पराभव झालेल्या निझामाने मुंगी-पैठण या गावात ६ मार्च १७२८ रोजी तह स्वीकारला. त्या तहात छत्रपती शाहू महाराज मराठी साम्राज्याचे छत्रपती आहेत हे निजामाने मान्य केले. पुढे मराठी साम्राज्य विस्तार होत गेला पुढे माळवा युद्ध झाले.मराठ्यांनी गुजरात ताब्यात घेतला पण निजामाच्या खोड्या अजूनही थांबायला तयार नव्हत्या. त्यातून अधून मधून छूप्या पद्दतीने त्रास देणे सुरूच होते..

वारणा तह

१७३१ मध्ये विशाळगडावर कोल्हापूर गादीचा आणि साताऱ्याच्या गादीत तह झाला. दोन्ही गाद्याचे भांडण मिटले. मग छत्रपती शाहू महाराजांच्या सैन्याने खोडी लावणाऱ्या निजामाचा बंदोबस्त करण्याचा चंग बांधला त्यातूनच २७ डिसेंबर १७३२ रोजी लातूर जवळ असलेल्या रुई - रामेश्वर येथे निजाम उल मुल्कने मराठेशाही विरुद्ध कट रचल्याबद्दल बाजीराव पेशवे, चिम्माजी आप्पा यांच्या समोर माफी मागितली. नंतर मात्र निजामाने मराठ्याची खोडी काढल्याचे नमूद नाही.

**निजामशाही स्थिरावण्याचा काळ..!!**

निजाम उल मुल्कचा कालखंड हा निजामशाहीच्या उदयाचा होता. त्या कालखंडात मराठ्यांशी कधी मैत्री तर कधी तह करून कधी माफी मागून निजामशाही टिकून राहिली. इ.स. १७२४ ते १७४८ अशी २४ वर्ष ही कारकीर्द राहीली. त्यानंतर निजामच्या वारसदारांमध्ये इ.स. १७४८ ते १७६२ पर्यंत वारसायुध्द घडुन आले. निजाम-उल-मुल्क नंतर त्याचा मुलगा निजाम अली हा हैद्राबाद संस्थानचा राजा झाला. त्याने स्वत:ला निजाम अशी पदवी धारण केली.म्हणून नंतरच्या सर्व राजांना निजाम असे संबोधण्यात येते. निजाम-उल-मुल्कला मोगल सम्राटाकडून 'आसफ जहा' असा किताब मिळाला होता. म्हणून या घराण्याचा उल्लेख आसफ जाह घराणे असाही करण्यात येतो.

निजामाशाहीने सुरुवातीपासूनच बलदंड सत्ते बरोबर दोस्ती करून वा नमते घेऊन आपले राज्य केल्याचे दिसून येते. १८ व्या शतकाच्या पुरवार्धात भारतात ब्रिटिशांचा दबादबा वाढायला लागला होता. हे हेरूनच निजाम अली यांनी ईस्ट इंडिया कंपनी यांच्या बरोबर १२ आक्टोबर १८०० मध्ये तैनाती फौजेचा करारकेला.या कराराद्वारे संरक्षणासाठी इंग्रजांची फौज सिकंदराबादला कायम झाली. या कारणामुळे निजामाने हिंदुस्तानातील कोणत्याही राजाबरोबर कसलाही संबध ठेवणार नाही, हे मान्य केले. इंग्रजांना फौजेच्या खर्चासाठी कडाप्पा, कर्नुल, अनंतपुर व बेल्लारी हे जिल्हे निजामाने ईस्ट इंडिया कंपनीला दिले. या करारामुळे परकीय आक्रमणापासून व अंतर्गत बंडखोरापासून पूर्ण रक्षण करण्याची जबाबदारी कंपनीने स्वत:वर घेतली.या करारापासुन हैद्राबादच्या निजामाचे स्वातंत्र्य नष्ट झाले. निजामअली नंतर (सन १७६३ ते १८०३) निजाम सिकंदरशहा (सन १८०३ ते १८२९), नासिरदौला (सन १८२९ ते १८५७), अफजूदौला (सन १८५७ ते १८६९), महेबुब अली खान (सन १८६९ ते १९११) यांनी राज्य केले.

**मीर उस्मान अलीची कारकिर्द (इ.स. १९११ ते १९४८)**

सातवा व शेवटचा निजाम मीर उस्मान अली खान २९ ऑगस्ट १९११ रोजी सत्तेवर आला.पहिल्या महायुध्दात निजामाने इंग्रजांना पैसा, सैन्य,वस्तू यांची भरपूर मदत केली. युध्दातील मदतीचे बक्षीस म्हणून ब्रिटीश सम्राट पाचवा जॉर्ज ह्याने निजामाला 'हिज एक्झाल्टेड हायनेसस' असा किताब दिला. निजाम मीर उस्मान अली खूप महत्वकांक्षी होता. स्वतंत्र इस्लामी राज्य स्थापन करण्याचे त्याचे स्वप्न होते. हैद्राबाद राज्यात राजभाषा फारशी होती.

१९२० पर्यंत मराठवाड्यात हायस्कूलची संख्या सहा एवढी होती. १९१७ मध्ये हैद्राबादला उस्मानिया विद्यापीठ स्थापन झाले तर १९२७ मध्ये औरंगाबादला इंटरमिजिएट कॉलेज स्थापन झाले. तोपर्यंत मराठवाडयात एकही कॉलेज नव्हते. महाविद्यालयीन शिक्षण उर्दूतून दिले जात असे. राज्यात खाजगी शिक्षण संस्था व वाचनालये यावर निर्बंध होते. हैद्राबाद राज्यात नौकऱ्या वरिष्ठ व प्रसिध्द कुटुंबातील लोकांना मिळत असत. हैद्राबाद राज्यात ११ टक्के मुस्लिम लोकसंख्या होती.

**सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळीच्या उदय**

संपूर्ण महाराष्ट्रात ब्रिटिश अंमल होता मात्र मराठी भाषिक प्रदेश असलेल्या मराठवाड्यात निजामशाही होती. शिक्षणाची आभाळ होती, काही शाळा होत्या पण त्यांची भाषा उर्दू होती. १९१७ ला हैद्राबाद मध्ये एक उस्मानिया विद्यापीठ व १९२७ मध्ये औरंगाबादला इंटरमिजिएट कॉलेज स्थापन झाले.

आजुबाजूच्या विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र , दक्षिण महाराष्ट्रात ब्रिटिश सत्ता होती, ब्रिटिश आधुनिक शिक्षणाच्या बाबतीत आग्रही होते.त्यामुळे तिथल्या जनतेचे शिक्षण होत होते. मात्र मराठवाड्यात

आधुनिक शिक्षण शिकण्याला मर्यादा येत होत्या त्याच बरोबर निजामी संस्थानामध्ये मराठवाडयातील लोकजीवनावर चौफेर सांस्कृतिक आक्रमण चालू



होते.

**सांस्कृतिक चळवळीचा उदय**

स्वातंत्र्याच्या चळवळी इतर भागात आकार घेत होत्या. त्यामुळे मराठवाड्यातही सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीच्या माध्यमातून लोकं जागृती मूळ धरत होती. लातूर मध्ये पुण्यावरून येऊन लोकमान्य टिळकांनी इ.स.१८९१ पहिली जिनिंग प्रेस काढली.त्यातून राजकीय जागृतीचं पाऊल मराठवाड्यात पडलं.. या निमित्ताने लोकमान्य टिळक यांनी हिंगोली, परभणीस भेट दिली होती.

१९०१ परभणीत गणेश वाचनालय सुरु झाले ते मराठवाड्यातील सर्वात पहिले वाचनालय होते. त्यानंतर हिंगोली, कळमनुरी, औंढा, औसा, सेलू, मानवत, नळदुर्ग, तुळजापूर, चाकूर, लोहारा येथेही वाचनालय सुरु झाली. १ ऑगस्ट १९२० रोजी औरंगाबाद येथे बलवंत वाचनालय स्थापन झाले. आ.कृ.वाघमारे हे या वाचनालयाचे प्रवर्तक होते.

खाजगी शाळा या राष्ट्रीय भूमीकेतून कार्य करु लागल्या. सरकारचे धोरण खाजगी शाळांबाबत फारसे अनुकूल नव्हते तरीही इ.स. १९३५ च्या सुमारास २० खाजगी शाळा राष्ट्रीय भावनेतून सुरु झाल्या. त्यात परभणीचे नुतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भूवन विद्यालय, शारदा मंदिर हिप्परगा येथील राष्ट्रीय विद्यालय, श्रीकृष्ण विद्यालय गुंजोटी, योगेश्वरी विद्यालय, अंबाजोगाई, श्यामलाल विद्यालय,उदगीर, ज्युबिली विद्यालय, लातूर, नुतन विद्यालय, सेलू, राजस्थान विद्यालय, लातूर, भारत विद्यालय,उमरगा, चंपावती विद्यालय, बीड, नुतन विद्यालय, उमरी, प्रतिभा निकेतन, नांदेड, मराठा हायस्कूल,औरंगाबाद असा क्रम लागतो. यामागे स्वामी रामानंद तीर्थ व बाबासाहेब परांजपे यांची प्रेरणा होती. वरील शिक्षण संस्थांनी मराठवाड्यात राष्ट्रीय जागृतीचे कार्य केले. शारदा मंदिर शाळेमुळे मुलींच्या शिक्षणाला चालना मिळाली. तर मराठा शिक्षण संस्थेने बहुजनांसाठी शिक्षणाची व्दारे खुली केली. साहित्य विषयक चळवळी सुरु झाल्या उर्दू भाषा शैक्षणिक व्यवस्थेतून राजभाषा बनली. त्यामुळे संस्थांनातील अन्य भाषा साहित्य व सांस्कृतीची गळचेपी होत गेली. या सांस्कृतिक संघर्षामुळेच साहित्य संस्थांचा जन्म झाला. साहित्य संस्थांनी राष्ट्रीय वृती जोपासली. इ.स. १९१४ -१५ मध्ये हैद्राबादेत दक्षिण साहित्य संघ स्थापन झाला. या कामात केशवराव कोरटकर व वामनराव नाईक यांनी पुढाकार घेतला. या साहित्य संघात अनेक मराठी तरुणांनी सहभाग घेतला. प्रारंभीच्या काळात विदर्भ साहित्य संघांशी ही शाखा संलग्न करण्यात आली. इ.स. १९३१ मध्ये हैद्राबादेत महाराष्ट्र साहित्य संमेलन घेण्यात आले. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर हे अध्यक्ष होते. आ.कृ. वाघमारे यांनी संजीवनी साप्ताहिकात मराठी भाषेच्या विकासबद्दल चिंता व्यक्त केली होती. लक्ष्मणराव फाटक यांनी इ.स. १९२० मध्ये 'निजाम विजय' हैद्राबादहून सुरु केले. आ.कृ. वाघमारे यांनी दिनांक १० फेब्रुवारी १९३७ रोजी मराठवाडा साप्ताहिकाची स्थापना केली. इ.स. १९३७ मध्ये निजाम प्रांतीय मराठी साहित्य परिषद स्थापन झाली. तिचे पहिले अधिवेशन १, २ व ३ ऑक्टोबर, १९३७ रोजी दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली हैद्राबाद येथे झाले. दुसरे अधिवेशन नांदेड येथे दिनांक २८ ते ३० सप्टेंबर, १९४३ मध्ये दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली झाले. इ.स. १९४४ मध्ये तिसरे अधिवेशन औरंगाबाद येथे ग.त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यामुळे मराठवाड्यात सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळीमुळ धरू लागल्या त्यातून अप्रत्यक्ष स्वातंत्र्याच्या चळवळीचे बीजे पेरली जाऊ लागली.

**महाराष्ट्र परिषदेचा प्रभाव वाढला, चळवळ जनमाणसात पोहचली**

हैद्राबाद संस्थाना मध्ये सांस्कृतिक, साहित्यिक संस्थाच्या उभारणीनंतर राजकीय जागृतीला जोर आला. हैद्राबाद संस्थांनामध्ये राजकीय जागृतीच्या जडणघडणीत महाराष्ट्र परिषदनी महत्वपूर्ण वाटा उचला. संस्थांनात जबाबदार राज्य पध्दतीचा पुरस्कार याच मंचावरून करण्यात आला. महाराष्ट्र परिषदे सह इतर परिषदांनी जनतेत जागृती घडवून आणण्याच्या दृष्टीने पुढील दशकभर मोलाचे कार्य केले.

महाराष्ट्र महापरिषदेची एकूण सहा अधिवेशने अनुक्रमे परतूर (जि. परभणी आता जि. जालना) , उमरी (जि. नांदेड), औरंगाबाद, सेलू (जि. परभणी) आणि लातूर येथे आयोजित करण्यात आलेली होती. महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनामुळे मराठवाड्यात सामाजिक, आर्थिक , शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात जागृती घडून आली. या अधिवेशास उपस्थित असलेल्या प्रमुख नेत्यांनी संस्थांनातील एकूण परिस्थितीची जाणीव निर्माण करुन दिली. मराठवाड्यातील जनतेला संघटित करण्याचे पायाभूत कार्य महाराष्ट्र परिषदेने यशस्वीरित्या पूर्णत्वास नेले. महाराष्ट्र परिषदेच्या सहा अधिवेशनाने परिषदेच्या कार्याचा वेग वाढविला. तसेच राष्ट्रीय विचारांचे वातावरण सर्वत्र निर्माण केले. बहुतेक अध्यक्षांनी शेती , शेतकऱ्यांचे , विणकरांचे जिव्हाळ्याने प्रश्न मांडले. शेतसारा, लेव्हीचा प्रश्न व सावकारशाहीच्या अन्यायी स्वरुपाचे प्रश्नही चव्हाट्यावर मांडले. खादी ग्रामोद्योग व स्वदेशीचा पुरस्कार करण्यात आला. बहुजन समाजाच्या सर्वांगिण उन्नतीच्या दृष्टीने महाराष्ट्र परिषदेने आग्रह धरला. शिक्षण प्रसार, अस्पृश्यता निवारण, प्रौढ शिक्षण, मंदिर प्रवेश, ग्रामोद्योग इत्यादीवर भर देण्यात आला. महाराष्ट्र परिषदेवर मवाळ-जहाल असे दोन गट होते. परंतु उमरी अधिवेशनानंतर महाराष्ट्र परिषदांचे कार्य जहाल होत गेले. जनेतेचे जिव्हाळ्याचे प्रश्न या व्यासपीठावरुन मांडण्यात आले. महाराष्ट्र अधिवेशनांना जोडूनच महिला, शेतकरी आणि विद्यार्थी परिषदांचे आयोजन केले होते.

**स्टेट कॉँग्रेसची स्थापना - बंदी व सत्याग्रह आंदोलन**

इ.स. १९३८ च्या अखेरीस संस्थांना मधील परिस्थिती क्रमश: बदलत होती. तिन्ही भाषिक प्रदेशात आप-आपल्या संघटना स्थापन करुन लोकजागृतीचे प्रयत्न सुरु झाले. याच काळात हैद्राबाद शहरात कॉँग्रेस कमिटीची स्थापन करण्यात आली. परंतु, तिचे स्वरुप मर्यादित होते. गस्ती निशाण ५३ अन्वये नागरी स्वातंत्र्याचा संकोच करण्यात आला होता. धुळपेठ दंगलीनंतर वातावरण तापले. शासन व पोलिस पक्षपातीपणे वागले. धूळपेठ दंगलीचे पडसाद मराठवाडा व कर्नाटकात उमटले. निजाम सरकारने महाराष्ट्र परिषदेस जातीय ठरवले. हैद्राबाद संस्थानात बाहेरुन येणाऱ्या २१ वृत्तपत्रांवर बंदी घालण्यात आली. स्वामी रामानंद तीर्थ हे इ.स. १९३८ मध्ये अंबाजोगाई सोडून महाराष्ट्र परिषदेची संघटना बळकट करण्याच्या दृष्टीने हैद्राबाद येथे वास्तव्यासाठी गेले. राजकीय परिस्थिती खुप झपाट्याने बदलत होती.जनतेच्या मुलभूत हक्कासाठी एखादी सर्वसमावेशक अशी राजकीय संघटना निर्माण करण्याची आवश्यकता वाटू लागली. यातूनच हैद्राबाद संस्थांनात दिनांक २९ जून, १९३८ मध्ये स्टेट कॉँग्रेसची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रारंभापासूनच निजाम सरकारच्या मनात स्टेट कॉँग्रेसमधील कॉँग्रेस हे शब्द खटकत होते. स्टेट कॉँग्रेस संस्थांना बाहेरील लोकांशी सलग्न आहे, असे निजामाला वाटत होते. तसेच स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ इत्यादींना निजामशाही शत्रू मानत असत. स्टेट कॉंगेस ही संघटना घातपाती स्वरुपाची व जातीय विचारसरणीचे कार्य करणारी विध्वंसक संघटना आहे, असे सरकारचे स्पष्ट मत होते. म्हणून निजाम सरकारने स्टेट कॉंगेसवर ७ सप्टेंबर, १९३८ रोजी बंदी घातली. या पार्श्वभूमीवर स्टेट कॉँग्रेसच्या लोकांना कायदेभंगाच्या चळवळीशिवाय अन्य मार्ग उरला नाही. हैद्राबाद स्टेट कॉँग्रेसने आपला लढा नागरी हक्कासाठी आहे, असे स्पष्टपणे सांगितले. संपूर्ण संस्थानातून तरुण कार्यकर्ते सत्याग्रह करण्यासाठी तयार झाले. स्टेट कॉँग्रेसने शांततामय व सनदशीर मार्गाने लढा चालविला. या सत्याग्रहात एकूण १८ तुकड्या तुरुगांत गेल्या. स्टेट कॉँग्रेसने या संघटेनेचे १ हजार २०० सभासद नोंदविले. इ.स. १९३८ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांनी सत्याग्रह केला. त्यामुळे त्यांच्यावर खटला भरण्यात आला. स्वामीजींना दीड वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा ठोठाविण्यात आली.

**गुंजोटी येथे वेदप्रकाश हुतात्मा झाले ; मराठवाडा मुक्ती लढा तीव्र झाला**

स्टेट कॉँग्रेसने स्वामी रामानंद तिर्थ यांच्या नेतृत्वाखाली संघर्ष तीव्र झाला , जुलूम व अन्याय यांचा प्रतिकार करणे हीच खरी ईश्वरभक्ती आहे. असे स्वामीजींचे सूत्र होते. सत्याग्रहींच्या सर्व तुकड्यांमध्ये मराठवाड्यातील तरुण आघाडीवर होते. गोविंदभाई श्रॉफ, माणिकचंद पहाडे यांनी कुशलपणे सत्याग्रहीचे संघटन केले. मराठवाड्यातील ३५० सत्याग्रहींनी भाग घेतला. सत्याग्रहासाठी तरुणांची मने प्रज्वलित करण्यासाठी गोविंदभाई श्रॉफ, माणिकचंद पहाडे , बाबासाहेब परांजपे, पुरुषोत्तमराव चपळगावकर, कर्वे गुरुजी यांनी मोलाचे योगदान दिले. स्टेट कॉँग्रेस व जातीयवादी संघटना यांच्या सत्याग्रहामध्ये गल्लत होऊन स्टेट कॉँग्रेसबद्दल गैरसमज वाटू लागले. म्हणून महात्मा गांधीजींच्या आदेशावरून स्टेट कॉँग्रेसचा सत्याग्रह स्थगित करण्यात आला.

**आर्य समाजाचे कार्य**

संस्थानात आर्य समाजाने अखिल भारतीय स्वरूपाचा लढा दिला. हैदराबाद संस्थांनातील हिंदू प्रजेवरील अन्यायाकडे लक्ष वेधण्यात आर्य समाज सफल ठरला. आर्य समाजाने २४ ऑक्टोबर, १९३८ पासून पुढे जवळपास दहा महिने सत्याग्रहाचा लढा चालवला. हिंदू संघटन करणाऱ्या आर्य समाजावर निजामाचा रोष होता. त्यामुळे संस्थांनात व मराठवाड्यात आर्य समाजाच्या शाखा वाढल्या. आर्य समाजाला जात, पात भेद व स्त्री - पुरुष भेद मान्य नव्हता, म्हणून त्यांनी अनेक अस्पृश्यांना वैदिक धर्मात समाविष्ट करून घेतले. संस्थानात १९४१ पर्यंत आर्य समाजाच्या २४१ शाखा कार्यरत होत्या. आर्य समाजाचे १२ हजार पेक्षा अधिक सत्याग्रही तुरुंगात गेले. संस्थानात एकूण ४० हजार एवढे आर्य समाजाचे अनुयायी असल्याचे दिसून येते. तेलंगण, कर्नाटक विभागाच्या तुलनेत मराठवाडा विभागात आर्य समाज अधिक प्रभावी होता. आर्य समाजाने सक्तीच्या धर्मांतरास विरोध केला. आर्य प्रतिनिधी सभेने शिष्टमंडळ पाठवून संस्थांनातील परिस्थितीची पाहणी करण्यात यश मिळवले. मराठवाड्यात धारूर, गुंजोटी, निलंगा, उमरगा, उदगीर येथील आर्य समाजी लोकांवर अधिक अन्याय झाले. गुंजोटी येथील तरुण कार्यकर्ता वेदप्रकाश याची क्रुर हत्या झाली. हैदराबाद संस्थानातील पहिला हुतात्मा वेदप्रकाशकडे झाले, आणि मराठवाडा मुक्ती चळवळीने सशस्त्र लढा हाती घेतला. उदगीरला शामलाल यांनी आर्य समाजाच्या चळवळीचे प्रभावीरीत्या संघटन केले. भाई शामलाल यांची बिदर तुरुंगात हत्या करण्यात आली. निझाम शासनाच्या अन्याय व अत्याचारामुळे संस्थानात आर्य समाजाची लोकप्रियता वाढत गेली व त्यातूनच चळवळीत नव-नवीन कार्यकर्ते व नेते उदयाला आले. आर्य समाजाने निजामाकडे केलेल्या १४ मागण्या केल्या होत्या. संस्थानात आर्य समाजाच्यावतीने पहिला सत्याग्रह दि. ३१ जानेवारी, १९३९ ला झाला. मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यांतून आर्य समाजाच्यावतीने सत्याग्रह झाले. नारायण स्वामी, नरदेव शास्त्री, नरेंद्र देव, बन्सीलाल, शेषराव वाघमारे, आनंद स्वामी, दिगंबरराव लाटकर, दिगंबरराव शिवणगीकर, निवृत्ती रेड्डी, गणपतराव कथले, शंकरराव पाटील अंधोरीकर यांनी आर्य समाजाच्या चळवळीत चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला .

**मराठवाडा मुक्ती लढ्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बळ**

निजामशाही संपविण्यासाठी सर्व समाज एकवटल्याचे आपण मागच्या लेखात पाहिले. आर्य समाज अत्यंत निर्णायक भूमिका घेऊन या लढ्यात सर्व सामर्थ्यांसह उतरला होताच. निजामाकडून मुद्दाम हा लढा कमकुवत व्हावा म्हणून अनेक चाली खेळल्या गेल्या त्यात 'पशत आक्काम' या नावाची संघटना निर्माण करून त्या संघटनेला खतपाणी दिले. या संघटनेत कांही तेलंगणा मधल्या दलित नेत्यांना हाताशी धरून चाल खेळली गेली.पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी योग्य वेळी यात हस्तक्षेप करून त्यांच्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचा स्वातंत्र्य संग्रामाला पूर्ण पाठिंबा दिला होता. नांदेडला शेड्युल्ड कास्ट फेडरेशन आणि पशत आक्कामच्या कार्यकत्यामध्ये जोरदार संघर्ष झाल्याची नोंद आहे. दलितांचे आणखी एक भारतीय स्तरावरील नेते पी. एन. राजभोज यांनीही सिकंदराबाद येथे जाहीर सभा घेऊन हैदराबाद मुक्ती संग्रामाला पाठिंबा दिला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हैदराबाद मुक्ती संग्रामाबाबत विचार अगदी स्पष्ट होते. संस्थानातील जनतेला आवाहन केले की, त्यांनी भारतीय संघराज्यात सामील व्हावे. हैदराबाद संस्थान स्वतंत्र म्हणजे भारताच्या विभाजनाची सुरुवात ठरेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटिश अधिसत्ता याची चिकित्सा केली आहे. १७ जून, १९४७ रोजी आपल्या विस्तृत निवेदनात त्यांनी संस्थानिक स्वतंत्र राहू शकत नाहीत असे सिद्ध करून दाखविले होते. हैदराबाद आणि भारत यांची भौगोलिक एकता अविभाज्य आहे. ती हैदराबाद संस्थानाला नष्ट करू देता कामा नये. निझाम हा शत्रू आहे, त्याची बाजू घेऊ नका, असे डॉ. आंबेडकरांनी दि. २७ नोव्हेंबर, १९४७ रोजी जाहीरपणे घोषित केले होते. भारतात सामील होण्यास नकार देणाऱ्या निझामाला काहीही सहानुभूती दाखवण्याची गरज नाही. निझाम हा भारताचा शत्रू आहे, म्हणून अनुसूचित जातींमधील एकाही माणसाने

पान २ वर

# कागदोपत्री कामे दाखवून लाखोंची बिले उचलली; कामाची पाहणी करुन सरपंचावर कारवाईची मागणी

## उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर वैजोडा ग्रामस्थांचे उपोषण

**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील वैजोडा येथील ग्रामस्थ उपविभागीय अधिकारी कार्यालया समोर उपोषणास बसले आहेत. मौजे वैजोडा येथे ग्राम पंचायत अंतर्गत केवळ बोगस कागदोपत्री कामे दाखवून लाखोंची बिले उचलली आहेत. मातोश्री पांदन रस्ता, पाणीपुरवठा टाकी , धनगर वस्ती म धील रस्ता, मातोश्री पांदन रस्त्याचे कोणतेही काम न करता गैर कायदेशीररित्या सरपंच व संबंधित अभियंता , पंचायत समिती परतुर गटविकास अधिकारी,यांनी संगणमत करून बिल उचलल्याने सदर कामाची पाहणी व पंचनामा करून सरपंचावर योग्य ती कारवाई करण्यात यावी.

अनेक वेळा ग्रामस्थ यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती परतुर ,व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जालना व वरिष्ठ कार्यालयांना तक्रारी अर्ज देऊन ही अद्याप पर्यंत कुठलीही कामाची चौकशी व कामाची पाहणी संबंधित अधिकाऱ्यांनी केलेली नाही.



तसेच रस्त्याचे मस्टर पेमेंट कोणत्याही प्रकारचे काम न करता उचललेले आहे .सरपंच या पदाचा गैरफायदा घेऊन संबंधित गावात कोणतेही काम न करता पेमेंट उचललेले आहे .गावात कोणत्याही प्रकारचे विकासकाम न करता पैसे उचलल्याचा आरोप ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात केला आहे.

त्यामुळे नाईलास्तव लोकशाही मार्गाने रास्त मागण्या करीता मा.उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयासमोर १६/०९/२०२४,पासून आमरण उपोषण आम्ही करत आहोत. त्याच्या सर्वस्वी परिणामाची जबाबदारी प्रशासनावर राहील याची प्रशासनाने नोंद घ्यावी असे हे निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे.

असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. या निवेदना वरील सह्या योगेश शिंदे,, रोहिनाना वैद्य, प्रताप वैद्य परमेश्वर जाधव ,गणेश गायवळ, लक्ष्मण गायवळ ,नरसिंह कवडे, अशोक कवडे, विष्णू रोडगे ,प्रकाश भदर्गे, गजानन यादव ,भाऊसाहेब खामकर, दत्ता गायवळ, नामदेव गायवळ ,विठ्ठल जाधव, दीपक वैद्य ,सुनील गुजर, शुभम वैद्य, सुभाष मैद,आसाराम मैद,शिवाजी निकम, मुकेश यादव, प्रभाकर मस्के ,प्रकाश कवडे, दिगंबर जाधव ,रामदास खेडकर ,लक्ष्मण शिंदे ,अतुल शिंदे, शिवाजी गायवळ, गजानन गायवळ, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आमदार लोणीकर यांच्या नेतृत्त्वावर विश्वास ठैवत मुस्लीम समुदायातील तरुणांचा भाजपात प्रवेश

## आगामी निवडणुकीत लोणीकर यांना निवडुन आणू - इमरान पठाण



**मंठा । प्रतिनिधी -** शहरातील विविध भागातील मुस्लिम तरुणांनी माजी मंत्री तथा विद्यमान आमदार वजी लोणीकर व भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल भैया लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत असंख्य तरुणांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला यामध्ये इम्रान पठाण, शेख इल्यास, जुनेद पठाण, शेख जब्बार, शेख रियाज, जफर पठाण, शेख एहसान, अजीस इक्राम पटेल, मतीन बागवान, समीर शेख, सोहेल पठाण रेहान शेख इरफान कुरेशी जफर शेख जॉन भाई अय्युब पठाण मुशिर सर शाहरुख आतार तनवीर शेख फेरोज पठाण सरताज पठाण इरफान शेख सोफियान पठाण एम . डी वसीम यांच्या सह असंख्य मुस्लिम तरुणांनी भारतीय जनता पार्टीचे कमळ हाती घेतले असून आगामी विधासभा निवडणुकीत आम दार बबनराव लोणीकर यांना बहुमाने निवडून आणू असा निर्धार यावेळी इम्रान पठाण यांनी व्यक्त केला यावेळी संदीप गोरे, पंजाब बोराडे, कैलास बोराडे, माऊली घोंडगे, कैलास चव्हाण, अभिजीत कोदंडे, नागेश घारे, राजेभाऊ खराबे, शरद मोरे, आदित्य दवणे, वैभव नरवडे, अर्जुन राठोड, रमेश राठोड यांच्यासह मोठ्या संख्येने भाजप पदाधिकारी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.